



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**




● वर्ष : ०२ ● अंक : ०६१ ● पुणे ● मंगळवार, दि. १४ जानेवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




इंदापूरात क्रुझर गाडीची उसाच्या ट्रॅक्टरला धडक 3



भरधाव कार घुसली थेट दुकानात; चालक अल्पवयीन 4

## ठळक बातम्या

### महिलेच्या पर्समधून ३० हजारांची रोकड लंपास

पुणे : (आरंभ पर्व): मकर संक्रांती सणानिमित्त तुळशीबागेत खरेदीसाठी आलेल्या एका महिलेच्या पर्समधून चोरट्याने ३० हजारांची रोकड लंपास केली. ही घटना विश्रामबागवाड्याजवळ एका कपड्याच्या दुकानाजवळ घडली. याबाबत उरवणे (ता. मुळशी) येथील एका ३५ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. त्यावरून विश्रामबाग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिला गृहिणी असून, त्या १२ जानेवारी रोजी सणानिमित्त कपडे खरेदी करण्यासाठी तुळशीबाग परिसरात आल्या होत्या. चोरट्याने गर्दीचा फायदा घेत महिलेच्या पर्समधून ३० हजार रुपये चोरून नेले.

### सदाशिव पेठेत भरदिवसा घरफोडी

पुणे : (आरंभ पर्व) : सदाशिव पेठेतील कुमठेकर रस्त्यावर एका घरातून चोरट्यांनी भरदिवसा मोबाईल आणि रोकड चोरून नेली. या प्रकरणी ओंकार पाटील (वय २४, रा. शुभंकर इमारत, कुमठेकर रस्ता) यांनी फिर्याद दिली आहे. चोरट्याने भरदिवसा घरात घुसून ओंकार यांचा मित्र विवेक पाटील यांचा मोबाईल आणि रोकड चोरून नेली.

### २९ लाखांची फसवणूक

पुणे : (आरंभ पर्व) : शेअर बाजारात गुंतवणुकीवर अल्पावधीत दुप्पट-तिप्पट परतावा देण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी कोथरूडमधील एका व्यक्तीची २९ लाख ४० हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत एका ५३ वर्षीय व्यक्तीने कोथरूड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी कोथरूडमधील मंत्री पार्कजवळ असलेल्या एका सोसायटीत राहतात.

# वाहतूक कोंडीत पुणे देशात तिसऱ्या स्थानी

## जागतिक पातळीवर चौथे स्थान; कोलकता, बंगळूरमध्येही बिकट स्थिती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सध्या बहुतांश शहरातील वाहनचालक वाहतूक कोंडीने त्रस्त झाले आहेत. तासनतास कोंडीत अडकून पडण्याचा अनुभव प्रत्येकांना येतो. यातच वाहतूक कोंडीचे वास्तव सांगणारा टॉमटॉम ट्रॅफिक इंडेक्स रिपोर्ट (वाहतूक निर्देशांक अहवाल) जारी झाला असून यात कोंडीच्या बाबतीत भारतात पुणे तिसऱ्या स्थानावर असून जागतिक पातळीवर त्याचा चौथा क्रमांक लागतो.



कोलकता आणि बंगळूरमधील प्रचंड वाहतूककोंडींने लोकांचे अनेक तास वाया घालविले असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. बंगळूरमधील सततच्या वाहतूक कोंडीमुळे कर्मचाऱ्यांना कार्यालयात पोचण्यास बराच वेळ लागत असल्याने अनेक कंपन्यांनी अनेकांना वर्कफ्रॉम होमची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

बंगळूरच्या वाहतूक कोंडीत अडकलेल्या कर्मचाऱ्यांनी गाडीतच किंवा बाईकवरच लॅपटॉप, मोबाईलच्या मदतीने बैठकीला हजेरी लावल्याचे किंवा कार्यालयातील महत्त्वाची कामे वाटेतच पूर्ण केल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. पण यंदा पुण्याची स्थिती गतवर्षीच्या तुलनेत अधिकच बिकट झाली आहे. दुसरीकडे बंगळूरची स्थिती गेल्यावर्षीच्या तुलनेत थोडी सुधारली आहे. टॉम टॉम ट्रॅफिक इंडेक्सच्या अहवालातून जगातील आणि देशभरातील शहरातील वाहतूक कोंडीच्या स्थितीवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

जगभरातील अनेक देशांतील सर्वेक्षणाच्या आधारावर टॉमटॉम.कॉमने ट्रॅफिक इंडेक्स म्हणजेच वाहतूक निर्देशांक जारी केला आहे. २०२४ च्या अहवालानुसार जगातील आघाडीच्या पाच महत्त्वाच्या शहरात तीन भारतीय शहरांचा समावेश आहे.

शिवाय कोलंबिया आणि ब्रिटनमधील शहरांचा समावेश आहे. जागतिक वाहतूक निर्देशांकानुसार भारताचे तीन शहरे अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या क्रमाकांवर आहेत.

यात जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडीचा मुकाबला करणारे तिसऱ्या क्रमांकांचे शहर बंगळूर तर चौथ्या क्रमांकावर पुणे आहे. भारतीय शहरांच्या निर्देशांकात या शहराचा क्रमांक अनुक्रमे दुसरा आणि तिसरा आहे. भारतात सर्वाधिक वाहतूक कोंडी कोलकता येथे आहे.

२०२४ मध्ये कोलकता येथे दहा किलोमीटरचा रस्ता पूर्ण करण्यासाठी ३३.३४ सेकंद लागले आणि हा काळ गेल्यावर्षीच्या तुलनेत (२०२३) दहा सेकंद अधिक आहे. कोलकता येथे २०२४ मध्ये नागरिकांनी सुमारे ११० तास वाहतूक कोंडीत घालविले.

गेल्यावर्षी वाहतूक कोंडीचा स्तर ३२ टक्के होता. पाच ऑक्टोबर २०२४ चा दिवस बंगळूरवासीयांसाठी सर्वात तापदायक ठरला. त्यावेळी दहा किलोमीटरसाठी ३९ मिनिटे आणि २१ सेकंद लागले आणि त्यावेळी वाहतूक कोंडीची पातळी ५८ टक्के होती.

> **पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महापालिका आणि वाहतूक पोलिस यांच्या समन्वयातून उपाययोजना करण्यात येत आहेत. दीर्घकालीन उपाययोजनांमध्ये पुरेशा प्रमाणात मेट्रो, रिंग रोड, उड्डाणपूल अशा पायाभूत सुविधांची गरज आहे. याशिवाय मध्यम आणि तत्काळ उपाययोजनांमध्ये मिसिंग लिंक जोडणे, सिग्नल सिंक्रोनायझेशन आणि रस्त्यातील अडथळे दूर करण्यात येत आहेत. पुणे पोलिसांकडून वाहतूक कोंडी दूर करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.**
> **- मनोज पाटील, अतिरिक्त पोलिस आयुक्त, पुणे शहर.**

# महापालिकेला पडला 'बालगंधर्व' पुरस्काराचा विसर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहर सांस्कृतिक राजधानी आहे, तेथे कलाकारांचा सन्मान केला जावा यासाठी महापालिकेने बालगंधर्व पुरस्कार देण्यास सुरुवात केली. पण २०२० आणि २०२१ या वर्षातला पुरस्कार जाहीर करून चार वर्ष सरली तरीही महापालिकेला या पुरस्कारचे वितरण करण्याचा विसर पडला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शिष्टमंडळाने आज (ता. १३) महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना यासंदर्भात निवेदन देऊन पुरस्काराची आठवण करून दिली आहे.



मनसेचे नेते बाबू वागस्कर, शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांच्या नेतृत्वाखाली शहर सचिव रमेश जाधव, रवी सहाणे, मनविसेचे सारंग सराफ, श्रीनिवास दिसले यांनी हे निवेदन दिले. यावेळी आयुक्तांनी लवकरच कार्यक्रम आयोजित करून कलाकारांना पुरस्काराने सन्मानित केले जाईल असे आश्वासन दिले आहे, असे बाबर यांनी सांगितले.

नटसम्राट बालगंधर्व यांच्या जन्मदिनानिमित्त पुणे महापालिकेने दरवर्षी ज्येष्ठ कलाकारास बालगंधर्व पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर नाट्य क्षेत्रातील पाच कलाकारांचा सत्कारही केला जातो. कोरोनाच्या पूर्वी हा पुरस्कार दिला जात होता, पण कोरोनानंतर पुरस्कार वितरण करण्यात आलेला नाही.

दरम्यान, संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायिका-अभिनेत्री निर्मला गोगटे यांना २०२० मध्ये आणि शास्त्रीय गायिका डॉ. रेवा नातू यांना२०२१ चा बालगंधर्व पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या दोन्ही कलाकरांना अद्याप गौरविले नाही तसेच पुरस्कार देण्यास विलंब का झाला आहे हे देखील कळविण्यात आलेले नाही. राज्याची सांस्कृतिक राजधानीत असे प्रकार यापुढे खपवून घेतले जाणार नाहीत, असे वागस्कर यांनी सांगितले.






# सिनेस्टाईल पाठलाग करुन चोरटा पकडला

## मंगळवेढा, मंद्रुप, मोहोळ, टेंभुर्णी, अक्कलकोट, कोंडी, दोड्याळ, हिरजसह "येथील' घरफोडी उघड

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)** : मागील वर्षभरात साथीदारांसोबत मंगळवेढा शहर, बठाण, मंद्रूप, मोहोळ, टेंभुर्णी, अक्कलकोट, दोड्याळ, कोंडी, हिरज अशा ठिकाणी घरफोड्या करणाऱ्या अशोक ऊर्फ आशिकाऱ्या छपरू काळे याला सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सिनेस्टाईल पाठलाग करून पकडले. त्याच्याकडून पोलिसांनी एकूण १९ लाख २८ हजार ५०० रुपयांचे जवळपास २८ तोळे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ खुणे व त्यांच्या पथकातील पोलिस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर यांना घरफोडीतील रेकॉर्डवरील अशोक ऊर्फ आशिकाऱ्या काळे मोहोळ येथे आल्याची खबर मिळाली. त्यानुसार गुन्हे पथकाने सापळा रचून अनगर परिसरातून त्यास पकडले. त्याच्याकडे कसून चौकशी केली, त्यावेळी सात-आठ महिन्यांपूर्वी त्याने साथीदारांसोबत मंगळवेढा शहरात रात्री घरफोडी केल्याचे सांगितले. आशिकाऱ्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून, त्याच्याविरुद्ध दाखल मंगळवेढा,



टेंभुर्णी व सोलापूर तालुका पोलिस ठाण्यातील प्रत्येकी तीन, मोहोळ पोलिस ठाण्यातील चार, मंद्रूप पोलिसांतील एक तर अक्कलकोट उत्तर पोलिसांतील दोन, अशा एकूण १६ गुन्ह्यांचा छडा लावण्यात पोलिसांना यश मिळाले आहे.

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ खुणे, पोलिस उपनिरीक्षक सूरज निंबाळकर, ख्वाजा मुजावर, राजेश गायकवाड, सहायक फौजदार नारायण गोलेकर, पोलिस हवालदार धनाजी गाडे, मोहन मनसावाले, मोहिनी भोगे, सागर ढोरे- पाटील, अक्षय डोंगरे, यश देवकते, योगेश जाधव, समर्थ गाजरे, चालक समीर शेख यांच्या पथकाने ही कामगिरी यशस्वी केली.

चोरीच्या पैशाच्या वाटणीवरून दोन खून केल्याच्या गुन्ह्यातील संशयित आशिकाऱ्या काळे साथीदारांसह चोरी, घरफोडी करताना जवळ मोबाईल ठेवत नव्हते, बंद घरे त्यांचे टार्गेट असायचे. आशिकाऱ्या काही महिन्यांपूर्वी मोहोळमधील एटीएम फोडण्याचा प्रयत्न करताना सीसीटीव्हीत कैद झाला होता. तो दिवसभर उसात झोपायचा आणि रात्री बाहेर यायचा. आशिकाऱ्या हा मूळचा कर्नाटकचा असून, तो अनेक वर्षांपासून भंडारकवठे (ता. दक्षिण सोलापूर) येथे राहायला होता. सतत तो ठिकाणे बदलून राहायचा. तो मोहोळमध्ये आला असल्याची खबर पोलिसांना लागली आणि वेशांतर करून पोलिस त्याचा शोध घेत होते. खासगी प्रवासी वाहनातून तो कुर्डुवाडीला जात असताना त्याला पुढे पोलिस असल्याचा संशय आला आणि चालू रिक्षातून उडी मारुन तो पळून जात होता. त्यावेळी पोलिस उपनिरीक्षक सूरज निंबाळकर व सागर ढोरे पाटील, अक्षय डोंगरे यांनी सिनेस्टाईल पाठलाग करून त्याला पकडले.






# महाविकास आघाडीला घरघर



उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली महाविकास आघाडीची स्थापना झाली तेव्हा भाजपाला सत्तेपासून दूर ठेवणे हाच एकमेव उद्देश्य या आघाडीचा होता. आणि सारे भाजपा द्वेष्टे त्यात सामील झाले होते. त्यात काँग्रेस होती तसेच शरद पवारांची राष्ट्रवादीही होती. पण २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी बंड केले. याचे कारण म्हणजे उद्धव ठाकरे यांच्या शिवसैनिकांना भेटायचेही नाही आणि शिवसैनिकांना तासंतास मातोश्रीवर रखडत ठेवायचे आणि स्वतःचे सारे लाड पुरवून घ्यायचे हे वर्तन सहन झाले नाही. त्यामुळे त्यांनी ठाकरे यांच्याविरोधात बंड पुकारले आणि त्यानंतर काही दिवसांतच ठाकरे सरकार कोसळले. यानंतर आज विधानसभा निवडणुका होऊन रीतसर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार स्थापन झाले.

या निवडणुकीनंतर अस्तित्वात आलेल्या महाविकास आघाडीला आता मात्र घरघर लागली आहे असे दिसू लागले आहे. याचे कारण आहे महाविकास आघाडीच्या तिनही पक्षांत एकजूट राहिली नाही. महाविकास आघाडीच्या जागावाटपापासून या आघाडीतील खेळाला सुरुवात झाली आणि जागावाटपाचा घोळ जाणूनबुजून लांबवला गेला असे अनेक आरोप काँग्रेस तसेच संजय राऊत यांनीही केले आहेत. आता महाविकास आघाडीचे नेते एकमेकांवर जागावाटपाचे खापर फोडत आहेत. पण ते मनाने एकत्र आले होते की, त्यांनी केवळ भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी हा पर्याय स्वीकारला होता याचा विचार केला पाहिजे. काँग्रेस आणि शिवसेना हे कधीही एकमेकांचे नैसर्गिक मित्र नव्हते. त्यामुळे ते राजकीय मजबुरीतून एकत्र आले तरी ते कितपत राहतील हा प्रश्नच होता. तसेच झाले. निवडणुकीत त्यांच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांविरोधात काम केले आणि एकमेकांवर आरोपही केले. परिणामी काँग्रेसचा आणि त्यामुळे महाविकास आघाडीचा विधानसभा निवडणुकीत पूर्ण सफाया झाला. आता सारेच नेते एकमेकांविरोधात बोलू लागले आहेत आणि त्यामुळे ही आघाडी राहते की टिकते अशी स्थिती आज उद्भवली आहे. कोणतीही वैचारिक जवळीक नसलेली आघाडी कधीच राहू शकत नाही हे या निमित्ताने पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

उद्धव ठाकरे जरी या आघाडीचे समन्वयक असले तरीही त्यांच्यात आता पूर्वीसारखी ताकद नाही. त्यामुळे त्यांना काँग्रेसचे नेते डोळे वटारू लागले आहेत. त्यामुळे ठाकरे यांचे वजन राहिलेले नाही आणि या आघाडीचे सर्वेसर्वा शरद पवार यांची भाजपाशी जवळीक वाढू लागली आहे, त्यामुळे संपूर्ण महाविकास आघाडीत अस्वस्थता आहे. पवार हे कोणत्याही क्षणी आपल्याला डिच्चू देऊन भाजपाकडे जाऊ शकतात या भावनेने आघाडीतील इतर पक्षांना ग्रासले आहे. त्यामुळे आघाडीतील घटक पक्षांतील नेत्यांमध्ये खटके उडायला सुरुवात झाली. शरद पवारांनी आघाडीत समन्वयाचा अभाव असल्याची नाराजी व्यक्त केली आहे. ती लक्षणीय आहे. विजय वडेट्टीवार यांनी, तर विधानसभेतील महाविकास आघाडीच्या पराभवाला जागावाटपास जबाबदार ठरवले आहे. यावरून महाविकास आघाडीत आता सुरळीत काहीही नाही आणि आता राजकारण कोणत्या दिशेने वळण घेईल हे सांगता येत नाही असे वाटू लागले आहे. महाविकास आघाडीत समन्वय नाही हे सर्वच नेते वरवर मान्य करत असले तरीही यावर ठोस उपाय कुणीही शोधत नाहीत. आता कोणत्याही महत्त्वाच्या निवडणुका नाहीत. राज्यातील अगदी स्थानिक पातळीवरच्या निवडणुका आहेत आणि त्यात राजकीय पक्षांचा कस लागत नाही. त्यामुळे महाविकास आघाडीला आता साऱ्या त्रुटी दूर करण्यासाठी भरपूर वेळ आहे. पण नेत्यांचे अहंकार आडवे येत आहेत. वडेट्टीवार आणि नाना पटोले यांच्यातील वाद हा राज्याच्या राजकारणातील प्रमुख मुद्दा ठरला. त्यामुळे विदर्भातील काँग्रेसच्या अनेक जागा गेल्या असा दावा आता राजकीय निरीक्षकांकडून वर्तवला जात आहे. यात तथ्यही आहेच. संजय राऊत यांनी काँग्रेसवर निशाणा साधला आहे, तर काँग्रेसने संजय राऊत यांच्यावर टीकेचा रोख ठेवला आहे. यातून काय दिसले तर काँग्रेस आणि शिवसेना उबाठा यांच्यात आता काहीही सुरळीत नाही. उलट दोन्ही पक्ष एकमेकांवर दुगाण्या झाडत आहेत. काँग्रेसच्या केंद्रीय समितीने म्हणावा तसा हस्तक्षेप केला नाही हाही आरोप आता होत आहे. हाही एक गंभीर आरोप आहे. याउलट भाजपा आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांनी निवडणुकीत एकसंध काम केले. त्यांनी आपले मतभेद चव्हाट्यावर येऊ दिले नाहीत. त्यामुळे या निवडणुकीत त्यांचे आमदार एवढ्या प्रचंड संख्येने निवडून आले.

महाविकास आघाडीला भवितव्य आहे की नाही हा प्रश्न आता कळीचा ठरणार आहे. कारण या आघाडीचे भवितव्य सध्या तरी अंधकारमय दिसत आहे. आघाडीला तारेल असा नेता दूरदूर दृष्टीपथात नाही. यात लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीची बैठक झाली नाही. या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. महाविकास आघाडीच्या सर्वच नेत्यांमध्ये कलगीतुरा रंगला आहे आणि एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करायला सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर ही आघाडी आगामी मुंबई महापालिका आणि स्थानिक स्वराज्य निवडणुकांना कशी सामोरी जाणार हा प्रश्नच आहे. संजय राऊत, विजय वडेट्टीवार, अमोल कोल्हे हे नेते प्रतिपक्षांच्या नेत्यांवर आरोप करत आहेत आणि त्यात आघाडीचे हसे होत आहे. यामुळे महाविकास आघाडीतील बिघाडी आता जनतेसमोर आली आहे. ही फुटलेली आघाडी घेऊन हे लोक जनतेसमोर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत समोर जाणार आहेत. त्यामुळे त्यांचे काय होणार हे अगोदरच लक्षात आले आहे. महाविकास आघाडीतील हा पेच सोडवणे सध्या तरी अशक्य दिसतो आहे आणि काँग्रेसच्या केंद्रीय नेत्यांनी यात हस्तक्षेप करूनही हा पेच सुटेल असे वाटत नाही.

# मुंडेंचा राजीनामा घेणे फडणवीस, पवारांची नैतिक जबाबदारी

## महाविकास आघाडीत कुठले मतभेद होणार नाहीत

**शिरूर (दै. आरंभ पर्व)**

राज्यभर गाजत असलेल्या संतोष देशमुख खून प्रकरणातील सर्व आरोपींचा बॉस धनंजय मुंडे आहे. त्यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांची नैतिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी येथे केले.



छत्रपती संभाजीनगर येथून मुंबईकडे जात असताना दानवे यांनी शिरूर येथे शिवसेनेचे तालुकाप्रमुख पोपट शेलार यांच्या कार्यालयास भेट दिली. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. दानवे म्हणाले की, सरपंच संतोष देशमुख यांच्या खूनप्रकरणी धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा ही मागणी सगळ्यात पहिली शिवसेनेने केली आहे. ज्या ठिकाणी घटना घडली त्या ठिकाणी सगळ्यात पहिला जाणारा मी आहे. तोपर्यंत याची दाहकता, तीव्रता, यातील राजकारण, अर्थकारण याची महाराष्ट्राला माहिती नव्हती. याबाबतचा आवाज अधिवेशनामध्ये सर्वप्रथम उठवून याची माहिती महाराष्ट्राला, जनतेला दिली आहे. त्यानंतर तेथील आमदार, राजकीय पक्ष यांनी आवाज उठवला. या गंभीर गोष्टीला हात घातला आहे. हजारो कोटींची संपत्ती जमवणारा वाल्मीक कराड याची ईडीने चौकशी करावी, अशी मागणी मी केली आहे. संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपींवर मोक्का लागला आहे. लवकर तुम्हाला वाल्मीक कराडला मोक्का लागलेला दिसेल, असेही दानवे यांनी सांगितले.

### शिवसेनेत असे अनेक माऊली

**शिरूर विधानसभेमध्ये शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख माउली कटके दुसऱ्या पक्षात गेले आणि निवडून येऊन आमदार झाले. शिवसेनेत असे अनेक माउली कटके आहेत की त्यांची निवडून येण्याची क्षमता आहे. परंतु आघाडीमुळे त्यांना वेगळा विचार करावा लागला. आमदार माउली कटके आणि आमचे या अगोदर नाते होते. आताही नाते आहे. भविष्यात वेळ पडली तर परिवर्तन होऊ शकते, असे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना केले.**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा अधिकार असतो. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वबळावर लढवाव्यात अशी इच्छा शिवसैनिकांची आहे. म्हणून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडून होकार येण्याची शक्यता आहे. विधानसभा, लोकसभा निवडणुकांत उमेदवार संख्या कमी असते. यात वाटाघाटी होऊ शकतात. यामुळे स्थानिक स्वराज्य निवडणुका स्वबळावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेंनी लढवल्यामुळे महाविकास आघाडीत कुठले मतभेद होणार नाहीत.

## जुन्नरमध्ये उत्पन्नाचा बनावट दाखला देणारे रॅकेट उघडकीस

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

५०० रुपयात अवघ्या पंधरा मिनिटात तहसीलदारांच्या डिजिटल सहीचा बनावट उत्पन्नाचा दाखला देणारे रॅकेट जुन्नर तालुका पुरवठा विभागातील कर्मचाऱ्याच्या सतर्कतेमुळे उघडकीस आले आहे. जुन्नर पोलिसांनी या संदर्भात विनोद चंद्रकांत बिडवई याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. तालुका पुरवठा निरीक्षक ज्ञानेश कुलकर्णी यांनी या संदर्भात जुन्नर पोलिसांकडे फिर्याद दिली होती. पुरवठा विभागाच्या कार्यालयामधील कर्मचारी दीपाली कोकणे यांच्याकडे ताराबाई शिंदे या शिधापत्रिका काढण्यासाठी आल्या होत्या. कोकणे यांनी शिंदे यांच्याकडील कागदपत्राची छाननी केली असता त्यामध्ये त्यांचे उत्पन्न अक्षरी ४५००० नमूद केले होते. त्यामुळे कोकणे यांनी सदर महिलेला कमी उत्पन्नाचा दाखला घेऊन या असे सांगितले. त्यानंतर शिंदे या ४२००० रुपये उत्पन्न असल्याचा दाखला घेऊन आल्या. परंतु सदर उत्पन्नाच्या दाखल्यावर मागील तहसीलदार रवींद्र सबनीस यांची डिजिटल सही दिसल्याने कोकणे यांनी उत्पन्नाचा दाखला महसूल विभागाच्या ऑनलाइन वेबसाईटवर तपासला. त्यावेळी सदर उत्पन्न दाखल्याची कोणतीही माहिती उपलब्ध होत नव्हती. म्हणून कोकणे यांनी पुरवठा निरीक्षक ज्ञानेश कुलकर्णी यांना सदरची माहिती दिल्याने त्यांनी उत्पन्न धारकाचा मुलगा दत्तात्रय शिंदे यास दाखला कोठे बनवला आहे. याची विचारणा केली. त्यावर दत्तात्रय याने सदरचा दाखला जुन्नरमधील शंकरपुरा पेठ चौकातील रामकृष्ण हरी लॉटरी सेंटरमध्ये दाखला बनवला असल्याचे सांगितले. या संदर्भात पुरवठा निरीक्षक कुलकर्णी यांनी शिंदे यांचा लेखी जबाब घेतला. तसेच कार्यालयीन कर्मचारी अभिजित पिंगळे यास तुझ्या नावाचा उत्पन्नाचा दाखला घेऊन ये असे सांगितले.

## ‘यूजीसी-नेट’ परीक्षा लांबणीवर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणातर्फे (एनटीए) १५ जानेवारीला घेण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोग – राष्ट्रीय पात्रता परीक्षा (युजीसी नेट) लांबणीवर टाकण्यात आली आहे. आता या परीक्षेची नवी तारीख स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार आहे. एनटीएचे संचालक राजेश कुमार यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. यूजीसी नेट परीक्षा डिसेंबर आणि जून अशी वर्षातून दोनवेळा घेण्यात येते. यूजीसी नेट या परीक्षेद्वारे सहायक प्राध्यापक पदासाठीची आणि कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्तीची पात्रता, तसेच पीएच.डी.साठी पात्रता ठरवली जाते. या परीक्षेसाठी ८५ विषय उपलब्ध असतात. डिसेंबर सत्राची परीक्षा ३ जानेवारी ते १६ जानेवारी या कालावधीत घेण्यात येत आहे. मात्र, मकर संक्रांत, पोंगल आणि सण असल्याने १५ डिसेंबर रोजी होणारी परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर केवळ १५ जानेवारी होणारी परीक्षा परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

## छाया काविरे पुरस्काराने सन्मानित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र प्रदेश शिक्षक काँग्रेस कमिटी तसेच पुणे शहर व जिल्हा शिक्षक काँग्रेस कमिटी यांच्या, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त रविवार दिनांक १२ जानेवारी रोजी पुणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.




या कार्यक्रमात “मुंबई तक”च्या पत्रकार मा. छाया काविरे यांचा सन्मानपत्र, संविधान प्रत देऊन सन्मान करण्यात आला. मिळालेल्या पुरस्काराने जबाबदारीत वाढ झाली आहे अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश शिक्षक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रकाश सोनवणे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष अभय छाजेड, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्यसचिव-राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, पश्चिम महाराष्ट्र काँग्रेस शिक्षक कमिटीचे उपाध्यक्ष सचिन दुर्गाडे, प्रदेश काँग्रसचे सदस्य व स्वागताध्यक्ष यशराजजी पारखी यांच्या हस्ते अनेक मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची मंचावरील जबाबदारी पुणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष विजय कचरे, पुणे जिल्हा काँग्रेस शिक्षक कमिटीचे अध्यक्ष रामप्रभू पेटकर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सदस्य व स्वागताध्यक्ष यशराजजी पारखी, पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस प्रल्हाद गिरमे, पुरंदर तालुका काँग्रेस शिक्षक कमिटीचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, कल्पना शेरे, आशुतोष पवार, जालिंदर घाटे, पुष्पक कांदळकर, गुलाबराव नेटके, धोंडीबा तरटे, डॉ. कल्याण वाघ, तकदीर सय्यद, सुभाष ससाने, कमलाकर डोके, प्रियंका नेटके, हरिदास चव्हाण, विठ्ठल रणशूर, अनिता कवठेकर, शैलजा पवार, भारत धावारे, ईश्वर भडकवाड, शैलजा लोखंडे, रत्नाकर जाधव, शिवाजी तलवारे, सुनिता बाबर, दै. संध्याच्या संपादिका सौ. ज्योती नाळे यांनी सांभाळली.

# कोट्यवधीच्या भ्रष्टाचाराची कायमस्वरूपी तरतुद

## निविदा रद्द करा, राष्ट्रवादीची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

क्रीडासंस्थांना खेळाचे तसेच व्यायामाचे साहित्य पुरवण्याच्या योजनेची कोट्यवधीची निविदा जाहीर करून क्रीडामंत्रालयाने कोट्यवधी रूपयांच्या भ्रष्टाचाराची कायमस्वरूपी तरतुद केली असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसने केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची दखल घ्यावी व ती निविदा त्वरीत रद्द करावी अशी मागणी करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य प्रवक्ते सुनील माने यांनी पक्ष कार्यालयातील पत्रकार परिषदेत हा आरोप केला. त्यासंबधीची कागदपत्रेही त्यांनी सादर केली. या निविदेद्वारे सुरूवातीला ३ व त्यानंतर किमान १० वर्षे कोट्यवधी रूपयांच्या भ्रष्टाचाराची तरतुद केली जात असल्याची टीका त्यांनी केली. क्रीडामंत्रालयात याची चर्चा सुरू असून मुख्यमंत्री व क्रीडामंत्री यामागे असल्याचे बोलले जात आहे. मागील मुख्यमंत्री, क्रीडामंत्री व की नव्या सरकारमधील हे त्यांच्याकडून सांगितले जात नाही, मात्र ही निविदा मागील सरकारच्या काळातील असल्याचे माने यांनी सांगितले. राज्यातील क्रीडासंस्था, संघटना यांना आमदारांच्या शिफारसीवरून खेळाचे तसेच व्यायामाचे साहित्य पुरवण्याबाबतची ही निविदा असल्याची माहिती माने यांनी दिली. त्यांच्याबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी संकेत शिंदे उपस्थित होते.

माने म्हणाले, दरवर्षी खेळाचे साहित्य पुरवण्याची १५० कोटी रूपयांची व व्यायामाचे साहित्य पुरवण्याची ८० कोटी अशी एकूण २३० रूपयांची ही निविदा आहे.



सलग ३ वर्षे (म्हणजे ६९० कोटी रूपये) हा पुरवठा करायचा आहे. ३ वर्षांनंतर नव्याने करार झाला नाही तर पुढे अनिश्चित काळासाठी हीच निविदा कायम राहील याचा उल्लेख निविदेतच करण्यात आला आहे. विशिष्ट कंपन्यांच निविदेसाठी पात्र ठरतील अशी तरतुद अटी व शर्तींमध्ये आहे. त्यात ५०० ठिकाणी एकाच वेळी पुरवठा करायचा अनुभव हवा, ५२ कोटी रूपयांची वार्षिक उलाढाल हवी, पॉझेटिव्ह नेटवर्क हवे ( कोरोना काळात स्पोर्टशी संबधित कंपन्यांचा व्यवहार पूर्ण थांबला होता, त्यामुळे असे पॉझेटिव्ह नेटवर्क असणाऱ्या मोजक्याच कंपन्या आहेत.) अशा अनेक अटी, शर्ती निविदेत आहे. त्यामुळे खेळाशी संबधित लहान कंपन्या यातून बाद होतात. मोठी उलाढाल असणाऱ्या काही विशिष्ट कंपन्या डोळ्यासमोर ठेवून या अटी टाकण्यात आल्या आहेत.

सलग ३ वर्षांची निविदा, त्यापुढे नव्याने करार झाला नाही तर १० वर्षे तीच निविदा अशा तरतुदीमुळे ही एक प्रकारे किमान १० वर्षे तरी भ्रष्टाचार होत राहील अशी ही सोय कोणीतरी करून घेतली आहे. त्याचा शोध मुख्यमंत्री फडणवीस यांनी घ्यावा. ६ कंपन्यांनी निविदा दाखल केली आहे, मुदत उलटून गेली तरीही निविदा खुल्या केलेल्या नाहीत, त्यामुळेच मुख्यमंत्र्यांनी याची चौकशी करावी, अशा अटी कोणाच्या सल्ल्याने टाकण्यात आल्या त्याचा तपास करावा, सर्वप्रथम निविदा रद्द करावी अशी मागणी पक्षाच्या माध्यमातून केली आहे असे माने यांनी सांगितले.

# थोडक्यात



## घरगुती गॅस सिलिंडरचा काळा बाजार; ६१ गॅस टाक्या जप्त

**पुणे (आरंभ पर्व) : घरगुती गॅस सिलिंडरचा साठा करून त्याची अवैधरीत्या सुरू असलेली विक्री सिंहगड रोड पोलिसाच्या पथकाने उघडकीस आणली. गॅसचा काळा बाजार करणाऱ्या एकाला अटक करून त्याच्याकडून टेम्पोसह ६१ गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत. विकास धोंडाप्पा आकळे (३१, रा. चरवड वस्ती, वडगाव बुद्रुक, मूळ. रा. सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. आकळे याच्यावर दोन महिन्यांपूर्वीदेखील अशाप्रकारे कारवाई करण्यात आली होती. सिंहगड रोड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक दिलीप दाईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक हद्दीत गस्तीवर होते. त्यादरम्यान वडगाव बुद्रुक भागात एकाने अवैधरीत्या गॅसचा साठा केला असून, त्याची चोरून विक्री करत असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून संबंधित ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी तेथे एक टेम्पो उभा असलेला दिसला. पोलिसांनी त्याची पाहणी केली असता, त्यामध्ये गॅसच्या टाक्या आढळून आल्या. त्यानुसार पोलिसांनी विकास आकळे याला ताब्यात घेऊन त्याच्यावर सिंहगड रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. त्याने या गॅस सिलिंडर कोणाकडून आणले, त्याची विक्री कुठे केली जाते, याबाबतचा तपास सिंहगड रोड पोलिस करीत आहेत. ही कारवाई सिंहगड रोड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिलीप दाईंगडे, गुन्हे निरीक्षक उत्तम भजनावळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक सचिन निकम, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, कर्मचारी संजय शिंदे, आण्णा केकाण आणि उत्तम तारू यांच्यासह पथकाने केली.**

## पौष पौर्णिमेनिमित्त जेजुरीत गाढवांचा बाजार; पुरातन काळापासून प्रथा

**जेजुरी (आरंभ पर्व) : पौष पौर्णिमा खंडेरायाच्या यात्रोत्सवानिमित्त गडकोटाच्या पायथ्याशी असलेल्या बंगाली पटांगणात गाढवांचा बाजार भरला आहे. बाजारात गुजरात (काठेवाड), राजस्थान व महाराष्ट्र (गावठी), आदी १५०० हून अधिक विविध प्रकारच्या जातींची गाढवे दाखल झाली आहेत. दरम्यान, बाजारात खरेदी-विक्रीतून दोन कोटी रुपयांपर्यंत उलाढाल झाली आहे. श्री खंडोबा देवाच्या जेजुरीनगरीत पौष पोर्णिमेनिमित्त पुरातन काळापासून गाढवांचा बाजार भरतो. यामध्ये माती वडार, गाडी वडार, मदारी, गारुडी, माकडवाले, कैकाडी, परीट, बेलदार, वडार, कुंभार, आदी समाजबांधव राज्याच्या विविध प्रांतांतून दाखल होत गाढवे खरेदी करतात. या व्यवहारामध्ये चार ते पाच कोटी रुपयांची उलाढाल होते. मात्र, दिवसेंदिवस खरेदी-विक्री कमी होऊ लागली आहे. जेजुरीत गाढवांच्या पारंपरिक बाजारात काठेवाड, गावठी आणि विविध प्रकारची हजारो गाढवे दाखल होत असतात. दातांवरून गाढवाचे वय ठरवले जाते. चार दात असलेल्या पशूला ‘चौवान,’ तर दोन दात असलेल्यास ‘दुवान’ म्हटले जाते. अक्कर म्हणजे ज्याला दात आलेले नाहीत असे छोटे पशू, यांना त्या मानाने किंमत कमी मिळते. काठेवाड (गुजरात) पशूची किंमत ५० ते ७० हजार रुपये; तर महाराष्ट्रीय गावठी पशूची किंमत २० ते ३५ हजार रुपये मिळत आहे. याबाबत कंधार (जि. नांदेड) येथून गाढवे खरेदीसाठी आलेले किसन गोविंद तेलंगे यांनी सांगितले की, यंदा पशूंच्या किमती आवाक्याबाहेर असून, नर कमी आणि मादी पशू विक्रीसाठी आलेल्या आहेत. काठेवाडी गाढव हे उंच, कणखर, ओझी वाहण्यासाठी मजबूत असल्याने त्यांची किंमत जास्त असल्याचे कोल्हार (जि. अहिल्यादेवीनगर) येथून आलेल्या दत्तू जाधव यांनी सांगितले. काही वर्षांपूर्वी आंध्र राज्यातील काही व्यापारी मांसविक्रीसाठी गाढवे खरेदी करण्यास येत होते. मात्र आम्ही संघटित होऊन त्यांना विरोध केल्याने ते आता फिरकत नसल्याचे सुभाष गायकवाड यांनी सांगितले.**

***पौष पौर्णिमा उत्सव व येथील बाजाराला मोठी परंपरा आहे. कायमस्वरूपी जागा राखीव ठेवावी व आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात, या मागणीसाठी सोमवारी (दि. १३) नामदार जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर यांच्या उपस्थितीमध्ये मेळाव्याचे आयोजन केले आहे.***

***- रामा यल्लप्पा काळे, येडशी, जि. धाराशिव***

# रक्तदान शिबिरास ९९३ रक्तदात्यांचा उच्चांकी प्रतिसाद



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी ड्रिम्स युवा सोशल फाऊंडेशन संचलित उरुळीकांचन ग्रामस्वच्छता अभियान ग्रुपच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबीराचे बी. जी. शिर्के प्राथमिक शाळा, उरुळी कांचन या ठिकाणी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर, श्रीमती अमृता क्षीरसागर (सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक), श्रीमती रेशमा शेख (सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक), प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे हे प्रमुख पाहुणे म्हणून तर प्रा. के डी कांचन (उपाध्यक्ष, महात्मा गांधी सर्वोदय संघ, ऊरुळी कांचन) हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

या रक्तदान शिबिरास ९९३ रक्तदात्यांनी उच्चांकी प्रतिसाद दिला .त्यामुळे परिसरात रक्तदाना विषयी एक नवीन जनजागृती झाली आहे .

याच कार्यक्रमाचे औचित्य साधून रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते सर्व सहभागी, आणि स्वयंसेवकांना मोफत हेल्मेट वाटप करण्यात आले. त्याचबरोबर पर्यावरण पूरक उपक्रमांची माहिती असलेल्या ड्रिम्स दिनदर्शिकचे प्रकाशन देखील करण्यात आले. यावेळी संदीप गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ओम राजु नवले यांने काढलेल्या रांगोळीचे विशेष कौतुक केले जात होते .

उद्घाटन प्रसंगी बोलताना "देशातील समस्यांवरती उपाययोजना करण्यासाठी युवकांची जागृती आणि सहभाग अत्यंत महत्वाचा आहे आणि ड्रिम्स युवा सोशल फाऊंडेशन राबवित असलेल्या सर्व उपक्रम आणि त्यामध्ये असलेला युवकांचे सहभाग उल्लेखनीय आहे." असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे डॉ. पराग काळकर सरांनी केले.

या शिबिराला सरपंच अमित कांचन ,देविदास भन्साळी, महादेव कांचन, सुरेखा भन्साळी, सुनिल कांचन, सुनिल तांबे, संभाजी कांचन, बजरंग म्हस्के, जयप्रकाश बेंद्रे, विजय टिळेकर, डॉ. शिवाजी बोराडे, अशोक मोरे, राजाराम कांचन, राजेंद्र टिळेकर , संतोष हरिभाऊ कांचन, सुनील जगताप, संतोष आबासाहेब कांचन, अलंकार कांचन, शांताराम चौधरी, सोमनाथ शेलार तसेच उरुळी कांचन नगरी मधील सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील सर्वच मान्यवर उपस्थित होते.

ससून रक्तपेढी आणि तर्पण रक्तपेढी यांच्यामार्फत रक्त संकलन करण्यात आले. आजच्या या रक्तदान शिबिरामध्ये एकुण ९९३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्यापैकी १६ महिला तर ९७७ पुरुष रक्तदात्यांचा समावेश होता. फाऊंडेशनच्या वतीने सर्व रक्तदात्यांना प्रमाणपत्र, नूतन वर्षाची ड्रिम्स दिनदर्शिका आणि भेट वस्तु देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुषिकेश भालेराव यांनी केले तर प्रास्ताविक धनाजी ढावारे आणि अरविंद चांदगुडे यांनी आभार प्रदर्शन केले.या सामाजिक चळवळीत पत्रकार सुद्धा सहभागी झाले होते .व पत्रकारांनी रक्तदान करुन समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे .व इतरांना पण रक्तदान करण्याचे आवाहन केले.

## थोडक्यात



### कोंढव्यामध्ये इमारतीत आग; लाखोंचे नुकसान, सुदैवाने जखमी नाही


पुणे (आरंभ पर्व) : इमारतीतील दुचाकीला लागलेल्या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. ही घटना सोमवारी (दि. १३) पहाटे सव्वातीनच्या सुमारास कोंढवा खुर्दमधील एनआयबीएम रोड, नताशा एन्क्लेव्ह या चार मजली इमारतीत घडली. दुचाकीने पेट घेतल्यामुळे इमारतीत पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर असणाऱ्या घरगुती वस्तूंमुळे आग पसरली होती. मात्र, अग्निशमक दलाच्या जवानांनी तत्काळ धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने आगीत कोणीही जखमी झाले नाही. अग्निशमक दलाच्या जवानांनी इमारतीत कोणी रहिवासी अडकले नसल्याची खात्री केली. आगीवर पाण्याचा मारा करत १० ते १५ मिनिटांत आगीवर नियंत्रण मिळवले. जवानांच्या सतर्कतेमुळे आग कुठल्याही घरात न पसरल्याने जीवितहानी झाली नाही. इमारतीत एका घरामधून लिकेज असणारा सिलिंडर जवानांनी वेळीच बाहेर काढल्याने अनर्थ टळला. तळमजल्यावर असणारे सलूनचे दुकानही सुरक्षित राहिले असून, आगीचे नेमके कारण समजू शकले नाही. या कामगिरीत कोंढवा खुर्द अग्निशमन केंद्र येथील प्रभारी अधिकारी कैलास शिंदे, वाहन चालक दीपक कचरे, तसेच तांडेल, नीलेश लोणकर, जवान मोहन सणस, सागर नेवगे, अनुराग पाटील आणि रामराज बागल यांनी सहभाग घेतला.

### धावत्या ट्रॅक्टरवरून पडला; चाके अंगावरून गेल्याने तरुणाचा मृत्यू



सोमेश्वरनगर (आरंभ पर्व) : बारामती तालुक्यातील सोमेश्वरनगर येथे धावत्या ट्रॅक्टरवरून पडून एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सोमेश्वरनगर येथे आप्पासाहेब जगताप नगर येथे करंजेपूल-वाणेवाडी रस्त्यावर ही घटना घडली. सांगसिंग दीपसिंग सिंग सध्या राहणार करंजेपूल (ता. बारामती, जि. पुणे मूळ रा. पद्रोडा, ता. भनियाना जि. जैसलमेल (राजस्थान) हा तरुण या अपघातात मृत्युमुखी पडला आहे. सांगसिंग हा या भागात फर्निचरचे काम करत होता. करंजेपूलकडून वाणेवाडीकडे जाणाऱ्या ट्रॅक्टरला त्याने लिफ्ट मागून तो कामानिमित्त वाणेवाडीच्या दिशेने निघाला होता. आप्पासाहेब जगताप नगरजवळ आल्यानंतर त्याचा तोल जाऊन तो डांबरी रस्त्यावर पडला व ट्रॅक्टरच्या मागे असणाऱ्या दोन्ही ट्रॉलीची चाके त्याच्या अंगावरून गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. ट्रॅक्टर चालक ट्रॅक्टरसह फरार झाला असून करंजेपूल पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

### विवाहाच्या आमिषाने महिलेवर बलत्कार, ३८ लाखांची फसवणूक



पुणे (आरंभ पर्व) : विवाहविषयक नोंदणी संकेतस्थळावरुन झालेल्य ओळखीतून एका उच्चशिक्षित महिलेवर बलात्कार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. आरोपीने उच्चपदस्थ अधिकारी असल्याची बतावणी करुन महिलेची ३८ लाख रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी आरोपीविरुद्ध बलात्कार, तसेच फसवणूक केल्याप्रकरणी मुंढवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका ३७ वर्षीय महिलेने मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात महिलेने विवाह नोंदणी संकेतस्थळावर नोंदणी केली होती. आरोपीने महिलेशी संपर्क साधून विवाह करण्यास इच्छुक असल्याचे सांगितले. त्यानंतर आरोपीने महिलेची भेट घेतली. उच्चपदस्थ शासकीय अधिकारी असल्याची बतावणी त्याने महिलेकडे केली. त्यानंतर महिलेला जाळ्यात ओढून त्याने तिच्यावर बलात्कार केला. जमीन खरेदीत गुंतवणूक करायची असल्याचे सांगून त्याने महिलेकडून ३८ लाख रुपये घेतले. महिलेने त्याच्याकडे विवाहाबाबत विचारणा केली तेव्हा त्याने टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे धाव घेतली. सहायक पोलीस निरीक्षक कल्पना सुरवसे तपास करत आहेत.

# इंदापूरात क्रुझर गाडीची उसाच्या ट्रॅक्टरला धडक

● एकाचा मृत्यू, ५ जखमी



**डाळज (दै. आरंभ पर्व)**

सोलापूर वरून पुण्याच्या दिशेने निघालेल्या क्रुझर गाडीने उसाने भरलेल्या ट्रॅक्टरला पाठीमागून धडक दिल्याने मोठा अपघात झाला. यामध्ये एकाचा मृत्यू झाला असून पाच जण जखमी झाले आहे. इंदापूर तालुक्यातील भादलवाडी गावच्याहद्दीत टॉवेल कंपनी शेजारी सकाळी ही घटना घडली. महामार्ग पोलीस मदत केंद्र डाळज यांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी नऊ वाजता सोलापूर वरून पुण्याच्या दिशेने निघालेल्या क्रूझर गाडीने उसाने भरलेल्या ट्रॅकरला गाडीवरचे नियंत्रण सुटल्याने पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात क्रूझर गाडीचे मोठे नुकसान झाले आहे. अल्लाबक्सर मोहंमद अली यांचा मृत्यू झाला असून कासीम मुल्ला, मोहंमद हुसेन, शमिता हुंचल, हुसेनबीन बहिरोद्री,शाबाई हुंचल हे सर्वजण जखमी झाले आहेत. हे सर्व कोची कोटा विजापूर येथील रहिवाशी आहेत. अपघाताची माहिती मिळताच डाळज येथील महामार्ग मदत केंद्रातील पोलीस व महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान घटना स्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना पुढील उपचारासाठी भिगवण येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे. आदल्या दिवशी रात्री झालेल्या अपघातात महिंद्रा पिकअप गाडीच्या चालकाने झोपेमध्ये आपली लेन सोडून रस्त्याच्या कडेला असणाऱ्या शेतात जाऊन पडली. यामध्ये गाडीचे मोठे नुकसान झाले व ड्रायव्हर किरकोळ जखमी झाल्याने त्याला पुढील उपचरासाठी भिगवण येथे पाठवण्यात आले होते.

# उजनी धरणाच्या जलाशयात वाळू माफियांचा धुडगूस

**इंदापूर (दै. आरंभ पर्व)**

स्थलांतरित पक्ष्यांचे ‘माहेरघर’ आणि नानाविध प्रकारच्या देशी-विदेशी पक्ष्यांची ‘पंढरी’ अशी ओळख असलेल्या उजनी धरणाच्या जलाशयात कोट्यवधी रुपये किंमतीचे काळे सोने म्हणून परिचित असलेल्या वाळू तस्करांचा धुडगूस सुरू आहे. वाळूमाफियांकडून रात्रंदिवस उजनीतील पक्ष्यांच्या अधिवासाला बाधा पोहोचवित बेकायदा वाळू उपसा केला जात आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाकडून वाळू माफियांविरोधात कारवाई सुरू करण्यात आली असून पोलीस आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्त कारवाईत इंदापूर तालुक्यातील कांदलगावपासून करमाळा तालुक्याच्या हद्दीपर्यंत वाळू तस्कारांचा पाठलाग करून सहा बोटी जप्त केल्या आहेत. उजनी जलाशयात यापूर्वीही अशी कारवाई करत वाळूमाफियांच्या बोटी जप्त करण्यात आल्या होत्या. मात्र, वाळूच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची माया गोळा केलेले माफिया पुन्हा मोठमोठ्या बोटी आणि तस्करीसाठी लागणारे साहित्य घेऊन रातोरात वाळू उपसा करत आहेत. तशा तक्रारीही स्थानिक नागरिकांकडून सातत्याने करण्यात आल्या आहेत. रात्री आणि दिवसाही हा वाळू उपसा सुरू असून वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केल्यानंतर दंड भरून वाहने सोडविली जातात आणि पुन्हा वाळू उपसा केला जातो. त्यातून राज्य शासनाचा महसूल बुडण्याबरोबरच पर्यावरणाचीही हानी होत आहे. उजनी जलाशयात आलेल्या अनेक देशविदेशातील पक्ष्यांनाही त्याचा त्रास होत असून वाळू उपसा आणि बोटीमुळे अनेक पक्ष्यांना प्राण गमवावा लागला आहे.

# 'तू तुझ्या घरचे बघ, तुझ्या मागे कुत्र नाही' : हाके यांना धमकी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बीड मधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे हीच माझी भूमिका आहे. माझं कुठलंही भाषण काढा. मी कधीही आरोपींचे समर्थन केलेल नाही मात्र मला आता जिवे मारण्याचे कॉल येत आहे. आत्ताच मला एका अनोळखी नंबर वरून फोन आला तू तुझ्या घरचे बघ, तुझ्या मागे कुत्र नाही अशी धमकी दिली आहे, असे ओबीसीचे नेते लक्ष्मण हाके यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



गेल्या काही दिवसांपासून माझ्या गाडीला कट मारले जात आहेत. मी कुठल्या हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी थांबलो तर लोक घोळका करून माझ्याकडे येत आहेत. मला रोज शंभरहून अधिक धमकीचे फोन कॉल घेत असल्याचे लक्ष्मण हाके यांनी सांगितले. हाके म्हणाले, लातूर जिल्ह्यातील धनगर समाजातील मुलाची हत्या ऑनर किलिंग मधून झाली आहे. सैराट चित्रपट यासारखी लातूर मधील ही घटना आहे. माऊली सोट याला न्याय मिळणार का? असा प्रश्न आमच्या समोर उभा राहिला आहे. कारण मुख्य आरोपी सोबत अभिमन्यू पवार यांचे फोटो आहेत. आरोपी सोबत फोटो आहेत म्हणून अभिमन्यू पवार यांनी राजीनामा द्यावा मी असं म्हणणार नाही. असेही हाके म्हणाले.

परभणी येथे सूर्यवंशी कुटुंबाची भेटीसाठी गेलेल्या लक्ष्मण हाके यांना बोलण्यापासून रोखण्यात आले होते. याबाबत बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, परभणी मध्ये जेव्हा मी श्रध्दांजली व्हायला उभे राहिलो तेव्हा मी फडणवीस यांचा हस्तक आहे, तुम्ही आरोपींची बाजू घेता असं म्हणत एका व्यक्तीने मला बोलण्यापासून रोखलं परंतु नंतर त्याला माझी भूमिका सांगितल्यानंतर त्या व्यक्तीने तुम्ही आमच्या बरोबर रहा आम्ही तुमच्या बरोबर राहू असं मला सांगितलं असल्याचे स्पष्टीकरण हाके यांनी दिला.

# ज्येष्ठाची ५ लाखांची फसवणूक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आर्मी ऑफिसर असल्याची बतावणी करत सायबर चोरट्याने कोथरूड भागातील एका ज्येष्ठ नागरिकाची पाच लाख ३५ हजार २०० रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी सायबर चोरट्याविरोधात कोथरूड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने कोथरूड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार एका बँक खातेधारकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक माहितीनुसार, तक्रारदार कोथरूडमधील गुरूराज हाऊसिंग सोसायटीत राहायला आहेत. डिसेंबर महिन्यात चोरट्याने या ज्येष्ठाच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. त्याने आर्मी ऑफिसर असून, कोथरूड भागात सदनिका भाडेतत्त्वावर घ्यायची आहे, अशी बतावणी केली. त्यानंतर चोरट्याने त्यांना डिपॉझिटसाठी लागणारी रक्कम पाठवतो, असे सांगितले. ज्येष्ठाच्या बँक खात्याची माहिती घेतली. त्याचा गैरवापर करून चोरट्याने ज्येष्ठाच्या खात्यातून ५ लाख ३५ हजार २०० रुपये काढून घेतले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तक्रारदाराने फिर्याद दिली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप देशमाने पुढील तपास करत आहेत.

# सुचिता हरपळे पुरस्काराने सन्मानित




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र प्रदेश शिक्षक काँग्रेस कमिटी तसेच पुणे शहर व जिल्हा शिक्षक काँग्रेस कमिटी यांच्या, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त रविवार दिनांक १२ जानेवारी रोजी पुणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमात “न्यूज प्रहार”च्या संपादिका मा. सुचिता राहुल हरपळे यांचा सन्मानपत्र, संविधान प्रत देऊन सन्मान करण्यात आला. पुरस्कार मिळणे म्हणजे आपण कार्य करीत असलेल्या क्षेत्रात अधिक जोमाने काम करण्यासाठी मिळालेली प्रेरणा असते. त्यामुळे हीच प्रेरणा घेऊन पत्रकारीता क्षेत्रात अधिक जोमाने काम करेल अशी भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश शिक्षक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रकाश सोनवणे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष अभय छाजेड, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्यसचिव-राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, पश्चिम महाराष्ट्र काँग्रेस शिक्षक कमिटीचे उपाध्यक्ष सचिन दुर्गाडे, प्रदेश काँग्रसचे सदस्य व स्वागताध्यक्ष यशराजजी पारखी यांच्या हस्ते अनेक मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

**कार्यक्रमाची मंचावरील जबाबदारी पुणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष विजय कचरे, पुणे जिल्हा काँग्रेस शिक्षक कमिटीचे अध्यक्ष रामप्रभू पेटकर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सदस्य व स्वागताध्यक्ष यशराजजी पारखी, पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस प्रल्हाद गिरमे, पुरंदर तालुका काँग्रेस शिक्षक कमिटीचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, कल्पना शेरे, आशुतोष पवार, जालिंदर घाटे, पुष्पक कांदळकर, गुलाबराव नेटके, धोंडीबा तरटे, डॉ. कल्याण वाघ, तकदीर सय्यद, सुभाष ससाने, कमलाकर डोके, प्रियंका नेटके, हरिदास चव्हाण, विठ्ठल रणशूर, अनिता कवठेकर, शैलजा पवार, भारत धावारे, ईश्वर भडकवाड, शैलजा लोखंडे, रत्नाकर जाधव, शिवाजी तलवारे, सुनिता बाबर, दै. संध्याच्या संपादिका सौ. ज्योती नाळे यांनी सांभाळली.**

# १२०० विद्यार्थी करणार योगाचा विश्वविक्रम

## योगाद्वारे उच्च दर्जाचे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिकपटू घडवणार : मुख्याध्यापिका धनावडे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विद्यार्थ्यांना लहान वयातच योगाची गोडी लागावी आणि त्यातून ते शारीरिकदृष्ट्या सुदृढ व बौद्धिकदृष्ट्या उन्नत व्हावे, या उद्देशाने डीईएस प्राथमिक शाळेत गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. या वेळेस क्रीडा क्षेत्रात काही अनोखे करण्याच्या उद्देशाने डीईएस प्राथमिक शाळेत दि. १८ जानेवारी २०२५ रोजी १२०० विद्यार्थी व पालक प्राचीन ते आधुनिक काळापर्यंतच्या विविध योगांचे प्रात्यक्षिक दाखवून एक विश्वविक्रम प्रस्थापित करणार आहे, अशी माहिती शाळेच्या



मुख्याध्यापिका अर्चना धनावडे यांनी एका पत्रकार परिषदेत दिली.

या विश्वविक्रमा संदर्भात सविस्तर माहिती देताना मुख्याध्यापिका धनावडे बोलत होत्या. या पत्रकार परिषदेला सीमरन गुजर, प्रोजेक्ट मॅनेजर ग्रेसी डिसूझा, क्रीडा शिक्षिका योगिनी कानडे आणि योगा उपक्रमाचे सल्लागार डॉ. मिलिंद संपगावकर आदी उपस्थित होते. शाळा समिती अध्यक्ष अंड. राजश्री ठकार यांचे ही या उपक्रमांस सहयोग लाभले आहे.

या वेळी बोलताना मुख्याध्यापिका धनावडे आणि उपस्थित शिक्षिकांनी सांगितले की, या योगा विश्वविक्रमात विद्यार्थी काल योग, सूर्यनमस्कार, चंद्रनमस्कार, ट्रायबल योगा, ॲनिमल योगा, बर्ड पोजेस, दंड योग, पार्टनर योगा, रिव्होल्यूशनरी पोजेस, तालीयोग, ऱ्हिदमिक योगा, इक्विमेंट योगा, थेरा बँड योग, ब्रिक्स योग, चेअर योगा, मेडिसनल बॉल योगा, योगा फॉर स्पोर्ट्स, डान्स योगा, पॅट्रियॉटिक मंडल योग, ॲक्वा योगा, स्पिरिच्युअल योगा आणि पावर योगा सादर करणार आहेत. या कार्यक्रमात पालकांच्या ढोलताशा पथकाचे संचलन पालकांद्वारे सादर होईल. शंखनाद करून कार्यक्रमाची सुरवात होईल व त्यानंतर सरस्वती पूजन झाल्यानंतर विद्यार्थी विविध योगासने सादर करतील.

कोरोना काळानंतर विद्यार्थ्यांची रोगप्रतिकारक क्षमता वाढवण्याचा प्रश्न ऐरणीवर आला होता. त्यामुळे आम्ही योगाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त आणि बौद्धिक दृष्ट्या तल्लख बनवण्यासाठी दोन वर्षांपूर्वी योगा क्लासेसची सुरवात केली. यात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. हा विश्वविक्रमाचा उपक्रम त्याचीच एक प्रचिती आहे. या माध्यमातून आमचा आंतरराष्ट्रीय दर्जाचे ऑलिम्पिकपटूदेखील घडवण्याचा मानस आहे.

डॉ. मिलिंद संपगावकर यांनी सांगितले की, १५० मिनिटांमध्ये विद्यार्थी हे ३० ॲक्टिव्हिटी सादर करतील. त्यासाठी विद्यार्थ्यांची जोरदार तयारी करण्यात आली आहे. शाळेने पालकांनादेखील यामध्ये सामावून घेतल्यामुळे आज त्याचा खूपच सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांवर झाला आहे.

## थोडक्यात



### एम्प्रेस गार्डन येथे चित्रकला स्पर्धेचा मुलांनी लुटला आनंद

पुणे (आरंभ पर्व) : एम्प्रेस बोटॅनिकल गार्डन तर्फे रविवार 12 जानेवारी 2025 रोजी एम्प्रेस बोटॅनिकल गार्डन येथे मुलांसाठी चित्रकला आणि हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सुमारे 9000 ते 1000 मुलांनी सहभाग घेत चित्रकला आणि हस्ताक्षर स्पर्धेचा आनंद लुटला. एम्प्रेस बोटॅनिकल गार्डन तर्फे दर वर्षी प्रमाणे यंदा हि चित्रकला आणि हस्ताक्षर स्पर्धा स्पर्धेचे आयोजन केले गेले असून या स्पर्धेत प्रवेश निशुल्क होते. 5-10 वर्षे मधील गटातील स्पर्धकांसाठी फ्लॉवर पॉट , घड्याळ, माझा आवडता प्राणी , तर 11-15 वर्षे गटातील स्पर्धकांसाठी डिफरेन्ट professions, sunrise /सनसेट , कलासरूम हा विषय देण्यात आला होता. पुणे शहरातील विविध भागातील ११ शाळेतील सुमारे 900 ते 1000 विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. सुरेश पिंगळे (मानद सचिव, एम्प्रेस बोटॅनिकल गार्डन), अनुपमा बर्वे (मानद सहसचिव) यशवंत खैरे उपस्थित होते, या स्पर्धेतील विजेत्यांना पुष्प प्रदर्शनाच्या समारोपाच्या म्हणजेच 27 जाने. 2025 रोजी बक्षिस वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती सुरेश पिंगळे यांनी दिली.

### नामांकित शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांची फ्री स्टाईल हाणामारी

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : लोणी स्टेशन परिसरातील एका मोठ्या नामांकित शिक्षण संस्थेतील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या टोळक्याने तिघांना दगडासह लाठी काठीने कपडे फाटेपर्यंत बेदम मारहाण केल्याची घटना सोमवारी (दि. १३) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास लोणी स्टेशन परिसरात असलेल्या इस्ट हेवन सोसायटीजवळ घडली आहे. विद्यार्थ्याकडून वारंवार होणाऱ्या अशा प्रकारच्या घटनांमुळे परिसरात स्थानिक नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. या संकुलात हजारो विद्यार्थी शिक्षण घेतात. तर काही विद्यार्थी संकुलाच्या वसतिगृहात राहतात. तर काही विद्यार्थी संकुलाच्या बाहेरच्या परिसरात भाडेतत्वावरील घेतलेल्या वस्तीगृहात राहतात. तर काही विद्यार्थी स्वतः फ्लॅट घेऊन मित्रांसोबत भाडेतत्वावर राहतात.या परिसरातील होस्टेलमध्ये शेकडो विद्यार्थी राहतात. या ठिकाणी शाळा, बँक, हॉटेल व विविध दुकाने आहेत. या परिसरात क्रीओंन प्री प्रायमरी स्कूल देखील आहे. या स्कूलची शाळा दररोज दुपारी एक वाजण्याच्या सुमारास सुटते. मुलांना घरी नेण्यासाठी त्यांचे पालक येत असतात. सोमवारी (दि. १३) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास नेहमीप्रमाणे शाळा सुटली. तेव्हा शाळेच्या जवळ असलेल्या इस्ट हेवन सोसायटीसमोर विद्यार्थ्यांमध्ये दगडासह लाठी काठीने मारहाण सुरु झाली.या घटनेमुळे शाळेतील लहान विद्यार्थी व शिक्षक, पालक वर्ग घाबरून गेला होता.या विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई व्हावी अशी स्थानिक नागरिक मागणी करीत आहेत.

### शिवाजीनगर भागात मेट्रोचे खांब चोरणारे गजाआड

पुणे (आरंभ पर्व) : शिवाजीनगर भागातील कामगार पुतळा परिसरातून मेट्रोचे दोन लाख रुपयांचे लोखंडी खांब चोरणाऱ्या चोरट्यांना पोलिसांनी अटक केली.गणेश मच्छिंद्र कांबळे (वय ४८), अनिकेत महेंद्र कांबळे (वय २७), तौसिफराज फैजअहमद शेख, शमशुद्दीन युसुफअली शेख मन्सुरी (सर्व रा. कामगार पुतळा, शिवाजीनगर), वसीम अयुब पठाण (वय ३२, रा. इंदिरानगर, गुलटेकडी), मुस्तफा मुस्तकीम शेख (वय ३५, रा. कोंढवा) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत मेट्रोचे सुरक्षारक्षक चंद्रकांत शेलार (वय ५१, रा. थेरगाव, चिंचवड) यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रो मार्गिकेचे काम सुरू आहे. शिवाजीनगर न्यायालय परिसरातील कामगार पुतळा परिसरात मेट्रोचे साहित्य ठेवण्यात आले आहे, दोन दिवसांपूर्वी कांबळे, शेख, मन्सुरी, पठाण यांनी कामगार पुतळा परिसरात ठेवलेले दोन लाख रुपयांचे लोखंडी खांब चोरले. एका वाहनात भरुन ते भंगारात विक्री करणार होते. मेट्रोचे सुरक्षारक्षक चंद्रकांत शेलार यांनी त्यांना हटकले. आरोपी लोखंडी खांब चोरुन नेण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर त्यांनी या घटनेची माहिती मेट्रोचे अधिकारी, तसेच पोलिसांना दिली. सहा जणांना पोलिसांनी अटक केली.

# विद्यार्थ्यांनी आत्मीक सामर्थ्य ओळखावे - प्रा. मिलिंद जोशी

## एमआयटी एडीटीत राष्ट्रीय युवा दिनानिमित्त विविध कार्यक्रम



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**
ध्येयनिश्चिती करा व ती साध्य होईपर्यंत स्वस्त बसू नका हा, स्वामी विविकानंदांचा विचार आज देशाच्या युवकांसाठी अत्यंत महत्वाचा आहे. देशाच्या विकासाची मुख्य जबाबदारी युवकांच्या खांद्यावर आहे. ते बुद्धिमान, तंत्रज्ञानाने निपुण आणि सर्जनशील आहेतच. त्यांच्यात नाविण्याचा शोध घेण्याची वृत्ती देखील आहे. परंतु, आपलं आत्मीक सामर्थ्य ओळखण्यात ते कमी पडतात. त्यामुळे, त्यांनी विवेकानंदांचा आदर्श घेवून सामर्थ्य ओळखावे, असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह विचार भारतीचे संपादक प्रा.मिलिंद जोशी यांनी केले.

ते येथील एमआयटी आर्ट, डिझाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठातील कुमार व्यास सभागृहात स्वामी विवेकानंद चेअर तर्फे राष्ट्रीय युवा दिनाच्या औचित्याने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजेश एस., आचार्य श्री शिवम, डॉ. माधवी गोडबोले, परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव नीलवर्ण, डॉ.अतुल पाटील, सहाय्यक कुलसचिव डॉ. विशांत चेमटे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ.जोशी पुढे बोलताना म्हणाले, भारत हा पहिल्यापासून तंत्रज्ञान, विज्ञानाने समृद्ध आहे. पश्चिमेतील राष्ट्रांनी वैज्ञानिक प्रगती केली मात्र, त्यांचा आत्मीक, मानसिक व भावनिक विकास झाला नाही. त्यामुळेच, "पूर्वेने पश्चिमेला तत्वज्ञान द्यावे व पश्चिमने पूर्वेकडून विज्ञान घ्यावे, व दोघांनी विश्वकल्याणाचे पसायदान गावे", असे सकारात्मक जागतिकीकरणाचे प्रथम उद्गाते स्वामी विवेकानंद म्हणत असत. अगदी अशाच प्रकारे विद्यार्थ्यांना आत्मीक सामर्थ्यवान बनविण्याचे कार्य डॉ.विश्वनाथ कराड व डॉ.मंगेश कराड करत आहेत, असेही ते म्हणाले.

विश्वशांती प्रार्थनेने सुरू झालेल्या या कार्यक्रमाची सांगता, पसायदानाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.नीलवर्ण यांनी तर आभार प्रा. अमिषा जयकर यांनी तर सुत्रसंचलन डॉ.अशोक घुगे यांनी केले.

### युवा दिनानिमित्त भरगच्च कार्यक्रम

**राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात वर्षभर उल्लेखनिय कामगिरी करणारे विद्यार्थी, विद्यापीठाचा अभिमान असणारे खेळाडू, युवा शिक्षक आदींचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात नशा मुक्ती संकल्प करून सायकल रॅलीने करण्यात आली. त्यानंतर, विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर आपले नृत्याविष्कार सादर केले. विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ.सुराज भोयार, डॉ. उल्हास माळवदे, डॉ. हनुमंत पवार यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

## भरधाव कार घुसली थेट दुकानात; चालक अल्पवयीन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
चालकाचे नियंत्रण सुटल्याने भरधाव कार थेट दुकानात शिरली. टिळक रोडवरील महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स दुकानात रविवारी पहाटे तीनच्या सुमारास ही घटना घडली. क्रेन बोलावून कार बाहेर काढण्यात आली. याप्रकरणी चालकावर गुन्हा दाखल केला आहे. शौकत कमलाकर बेळ (१९, हडपसर, काळेपडळ) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे.

अधिक माहितीनुसार, शौकत बेळ याचे रविवारी पहाटे तीनच्या सुमारास कारवरील नियंत्रण सुटल्याने गाडी फुटपाथवर चढली अन् महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक दुकानात शिरली. यात दुकानातील साहित्याचे नुकसान झाले. चालकासोबत त्याचे दोन मित्रदेखील गाडीत होते. चालक मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत होता का, अशी विचारणा पोलिसांना केली असता त्यांनी चालकाने मद्यप्राशन केले नसल्याचे सांगितले.

दरम्यान, सोशल मीडियावर अपघातानंतर एक मेसेज व्हायरल झाला. त्यामध्ये चालकाने कार भरधाव चालवून ती दुकानात घातली. नंतर परस्पर क्रेन चालकाला बोलावून दुकानातील कार काढत असताना नागरिकांनी संबंधित दुकानदाराला माहिती दिल्याचे मेसेजमध्ये नमूद केले आहे. याप्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सुरू आहे.

## राज्यस्तरीय ऑनलाइन रेखाचित्र स्पर्धेचे आयोजन

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
राज्यातील ३ ते १३ वयोगटातील विद्यार्थ्यांना त्यांची सर्जनशीलता दाखवण्याची अनोखी संधी उपलब्ध झाली आहे. या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी मुंबईतील आघाडीची आरोग्यसेवा कंपनी मेफार्म लाईफसायन्सेसने ड्रोवी राज्यस्तरीय रेखाचित्र स्पर्धा २०२५ आयोजित केली आहे. विशेष म्हणजे ही स्पर्धा ऑनलाइन घेतली जाणार आहे. विजेत्यांना प्रत्येक वयोगटात तीन रोख बक्षीसे दिली जातील. सर्व सहभागींना ई-प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. तर रोख बक्षीसे महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमधील आघाडीच्या बालरोग तज्ज्ञांद्वारे वितरित केली जातील. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्यांनी त्यांचे रेखाचित्र क्युआर कोडद्वारे किंवा व्हाट्सऍप क्रमांकाद्वारे सबमिट करायचे आहे. स्पर्धेसाठीची आवश्यक माहिती देखील त्यात आहे. स्पर्धेचा फॉर्म मिळविण्यासाठी, पूर्ण करण्यासाठी आणि सबमिट करण्यासाठी पालक त्यांच्या बालरोग तज्ज्ञांच्या रिसेप्शनिस्टशी देखील संपर्क साधू शकतात. मुलांची रेखाचित्रे २६ जानेवारी २०२५ पर्यंत क्युआर कोडद्वारे किंवा व्हाट्सऍप द्वारे दाखल करू शकतात.

या वर्षीच्या स्पर्धेची मध्यवर्ती थीम ड्रोवी- एक उत्साही आणि मैत्रीपूर्ण पात्र आहे. सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या कलाकृतींमध्ये यंदाची थीम जिवंत करण्यासाठी आणि ड्रोवीच्या जगाबद्दल त्यांचा 'अद्वितीय दृष्टिकोन' प्रदर्शित करण्यासाठी ही एक अनोखी संधी असून त्यात सहभागी होण्याचे आवाहन मेफार्मने केले आहे.

"या उपक्रमाचा एक भाग म्हणून, आम्ही सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे आणि विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्ती कौशल्यांना वाढवणे, तरुण कलाकारांना 'कलेच्या माध्यमातून स्वतःला व्यक्त करण्याची एक संधी उपलब्ध करून देत आहोत. मुलांसाठी संशोधन केंद्रित आरोग्यसेवा उत्पादनांसाठी ओळखले जाणारे मेफार्म लाईफसायन्सेस सकारात्मक सामाजिक प्रभाव निर्माण करण्यासाठी बालरोगतज्ञ आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांशी सहयोग करत आहे. ही स्पर्धा तरुण मनाच्या क्षमतेचे संगोपन करण्यासाठी त्यांची सततची वचनबद्धता आहे." समीर कोल्हे, संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक, मेफार्म लाईफसायन्सेस

नोंदणी तपशिलासाठी आणि सहभागी होण्यासाठी, क्युआर कोड स्कॅन करा किंवा व्हाट्सॲपवर 9930031582 वर हाय मेसेज पाठवा.

अधिक माहितीसाठी - व्हँटेज पॉइंट कम्युनिकेशन्स - कुसुम राजपुरोहित - 70586 68665 यांना संपर्क करा.

### वयोगट आणि विषय

**३-७ वयोगटातील मुलांसाठी**
- **मी आणि माझा मित्र ड्रोई शाळेत चांगला वेळ घालवत आहोत.**
- **मी आणि माझा मित्र ड्रोई एकत्र खेळत आहोत.**

**७-१३ वयोगटातील मुलांसाठी:**
- **मी आणि ड्रोई हरित भविष्यासाठी काम करत आहोत.**
- **मी आणि ड्रोई एकत्र गरजूंना मदत करत आहोत.**

## संपादिका सौ. ज्योती नाळे पुरस्काराने सन्मानित

### पुणे शहर व जिल्हा काँग्रेस कमिटी यांच्यावतीने "सन्मान नारी शक्तीचा २०२५" पुरस्काराचे वितरण



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
महाराष्ट्र प्रदेश शिक्षक काँग्रेस कमिटी तसेच पुणे शहर व जिल्हा शिक्षक काँग्रेस कमिटी यांच्या, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त रविवार दिनांक १२ जानेवारी रोजी पुणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमात "दै. संध्या"च्या संपादिका मा. सौ. ज्योती नाळे यांचा सन्मानपत्र, संविधान प्रत देऊन सन्मान करण्यात आला.

पत्रकारांचा आणि संपादकांचा गौरव होणे ही अभिमानाची बाब असून पत्रकार हा रोजच्या आयुष्यातील महत्वाचा घटक आहे. मिडीयात जे काही दाखवले जाते तेच खरे आहे असा आपल्या समाजाचा मानस आहे. अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश शिक्षक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रकाश सोनवणे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष अभय छाजेड, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्यसचिव-राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, पश्चिम महाराष्ट्र काँग्रेस शिक्षक कमिटीचे उपाध्यक्ष सचिन दुर्गाडे, प्रदेश काँग्रेसचे सदस्य व स्वागताध्यक्ष यशराजजी पारखी यांच्या हस्ते अनेक मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

**कार्यक्रमाची मंचावरील जबाबदारी पुणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष विजय कचरे, पुणे जिल्हा काँग्रेस शिक्षक कमिटीचे अध्यक्ष रामप्रभू पेटकर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सदस्य व स्वागताध्यक्ष यशराजजी पारखी, पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस प्रल्हाद गिरमे, पुरंदर तालुका काँग्रेस शिक्षक कमिटीचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, कल्पना शेरे, आशुतोष पवार, जालिंदर घाटे, पुष्पक कांदळकर, गुलाबराव नेटके, धोंडीबा तरटे, डॉ. कल्याण वाघ, तकदीर सय्यद, सुभाष ससाने, कमलाकर डोके, प्रियंका नेटके, हरिदास चव्हाण, विठ्ठल रणशूर, अनिता कवठेकर, शैलजा पवार, भारत धावारे, ईश्वर भडकवाड, शैलजा लोखंडे, रत्नाकर जाधव, शिवाजी तलवारे, सुनिता बाबर, दै. संध्याच्या संपादिका सौ. ज्योती नाळे यांनी सांभाळली.**

## हटकल्याच्या रागातून पोलिसांनाच लाथाबुक्क्यांनी मारहाण

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**
भांडण करत असलेल्यांना हटकल्याने पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या पोलिसांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याचे समोर आले आहे. ही घटना शनिवारी (दि. ११) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास यमुनानगर, निगडी येथे घडली.

प्रमोद प्रकाश साखरे (२६, भोंडवे बाग, रावेत), वैभव भाऊसाहेब तुपे (२८, रा. ओटास्कीम, निगडी), अजय बाबासाहेब पोळ (२१, गुरुदत्त कॉलनी, निगडी) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलिस हवालदार प्रवीण कांबळे (नेमणूक : गुन्हे शाखा) यांनी निगडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रवीण कांबळे सहकाऱ्यांसोबत निगडी परिसरात गस्त घालत असताना, संशयित आपसात भांडण करत असल्याचे आढळले. पोलिसांनी त्यांना हटकले असता, संशयितानी आपसात संगनमत करून पोलिसांवर हल्ला चढवला. त्यांनी हवालदार कांबळे यांना जमिनीवर पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

तसेच, "पोलिसांना खूप माज आला आहे," असे म्हणत एका पोलिसाचे बोट पिरगळले. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपायुक्त संदीप डोईफोडे, सहाय्यक पोलिस आयुक्त विशाल हिरे, पोलिस निरीक्षक विजय ढमाळ, आणि शत्रुघ्न माळी यांनी घटनास्थळी धाव घेतली.

संशयितांना ताब्यात घेऊन गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणले असता, त्यांनी अधिकाऱ्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. संशयित प्रमोद साखरे आणि वैभव तुपे यांनी भिंतीवर डोके आपटून कार्यालयातील साहित्याची तोडफोड केली. शिवाय, "तुमच्या सगळ्यांना बघून घेतो, तुमच्या सगळ्यांना कामाला लावतो," अशी धमकी दिली.

# मुंबईत २३ जानेवारीपासून पेपरवर्ल्ड इंडिया आणि कॉर्पोरेट गिफ्ट शो प्रदर्शन



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
'पेपरवर्ल्ड इंडिया आणि कॉर्पोरेट गिफ्ट्स शो' दर्शन येत्या २३ ते २५ जानेवारी २०२५ या मुंबईतील 'बॉम्बे एक्झिबिशन सेंटर' येथे होणार आहे. एखाद्या कार्यालयात उच्च-गुणवत्तेच्या स्टेशनरीसाठी (लेखनसाहित्य/ सामग्री) हे प्रदर्शन उत्तम व्यासपीठ ठरणार आहे. यामध्ये उत्कृष्ट कॉर्पोरेट, हंगामी आणि उत्सवातील भेटवस्तू तसेच विशेषतः सानुकूलित केलेल्या भेटवस्तूंचा समावेश आहे. या प्रदर्शनात अभ्यागतांना ३४०+ हून अधिक प्रदर्शकांकडून आकर्षक नवकल्पना, उत्पादने तसेच तंत्रशास्त्रविषयक उपाय अनुभवता येणार आहेत. शिवाय १७ हजार स्क्वेअर मीटरहून अधिक क्षेत्रफळात आयोजित केलेल्या या प्रदर्शनामध्ये अनेक उत्पादनांचे अनावरणही करण्यात येणार आहे.

'पेपरवर्ल्ड इंडिया'ने यंदाच्या आर्थिक वर्षात टिकाऊ पेपर ब्रँड्ससह शैक्षणिक खेळणी, कागद आणि कागदाची उत्पादने यांसारख्या क्षेत्रांत आपला ठसा उमटवला आहे. त्याचप्रमाणे, 'कॉर्पोरेट गिफ्ट शो'ने फार्मा पॅकेजिंग आणि भेटवस्तू, गिफ्ट ब्रँड आणि बॅग आणि पोशाख यांसारख्या क्षेत्रांमध्येही वाढ अनुभवली आहे. स्टेशनरी, कागद आणि कागदी उत्पादने तसेच कॉर्पोरेट भेटवस्तू विभाग हे भारतातील सर्वात गतीने वाढणारे क्षेत्र आहे. सतत नवीन आणि आकर्षक उत्पादने विकसित करण्याची त्यांची क्षमता ग्राहकांना आकर्षित करून मागणीत वाढ दर्शवत आहे. 'मोर्डोर इंटेलिजन्स'च्या अहवालानुसार, जागतिक स्टेशनरी आणि पुरवठा बाजार २०२४ मध्ये अंदाजे १४५.२१ अब्ज अमेरिकी डॉलर मूल्याचा आहे. २०२९ पर्यंत हा पुरवठा बाजार १७८.६३ बिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा वर्तविण्यात आली आहे, तर चक्रवाढ वार्षिक वाढ दर ४.२३ टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा ठेवण्यात आली आहे. तसेच ई-कॉमर्सच्या वाढीमुळे भारतात वैयक्तिक भेटवस्तू देण्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. 'बोनाफाईड रिसर्च'च्या अहवालानुसार, भारताचा वैयक्तिक भेटवस्तू बाजार २०२९ पर्यंत ५४० दशलक्ष डॉलरपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. भेटवस्तूंमध्ये विविध आधुनिक पर्याय उपलब्ध असल्याने ही वाढ दिसून येत आहे. सध्याच्या घडीला पर्यावरणपूरक उत्पादने आणि टिकाऊपणावर नव्याने भर दिला जात आहे. 'इंडियन रिटेलर्स असोसिएशन'च्या मते, ६९ टक्के शहरी ग्राहक पर्यावरणपूरक भेटवस्तूंना प्राधान्य देतात. 'पेपरवर्ल्ड इंडिया'तर्फे प्रदर्शनात अभिनव सामग्री, पेपर उत्पादने आणि पर्यावरणपूरक स्टेशनरी सादर करण्यात येणार आहे. तसेच शाळा आणि कार्यालयीन स्टेशनरी, डिजिटल लर्निंग आणि शिकवणीत साह्य ठरणारी आणि वर्गातील विविध उपयुक्त वस्तूंचे पर्यायही सादर केले जाणार आहेत. अभ्यागत प्रकाशक, उत्पादक, संघटना आणि इतर भागधारकांशी संपर्क साधण्यासाठी लाभ घेऊ शकतात. 'कॉर्पोरेट गिफ्ट्स शो'मध्ये Kimirica, Loyka, Naseem Perfumes, Sapphire Chocolates आणि इतर बऱ्याच प्रतिष्ठित ब्रँडची प्रीमियम गिफ्टिंग उत्पादने असणार आहेत. तसेच हंगामी आणि सणउत्सवातील भेटवस्तू, आरोग्याशी संबंधित भेटवस्तू, गृह सजावट आणि कापडी भेटवस्तू, कपडे आणि उपकरणे, कला आणि हस्तकला उत्पादने, बॅग आणि सूटकेस, मिठाई - चॉकलेट गिफ्ट उपाय इतर अनेक भेटवस्तू उपलब्ध असणार आहेत.

**'मेस्से फ्रँकफर्ट एशिया होल्डिंग्ज लिमिटेड'चे कार्यकारी संचालक आणि बोर्ड सदस्य श्री. राज मानेक म्हणाले की: 'पेपरवर्ल्ड इंडिया' व 'कॉर्पोरेट गिफ्ट शो' यांच्या आगामी आवृत्या स्टेशनरी उद्योगाला आकार देणाऱ्या नवीन ट्रेंडवर प्रकाश टाकेल. दोन्ही प्रदर्शन विभाग अतिशय जोशपूर्ण असून, यावर्षी प्रदर्शक त्यांच्या उद्योगांमधील उदयोन्मुख उत्पादन ट्रेंड सादर करतील. त्याचबरोबर मला सांगताना आनंद होत आहे की, आमच्याकडे असे ब्रँड आहेत जे टिकाऊ/शाश्वत उपाय सादर करत आहेत. सामान्य भेटवस्तू, कार्यालय आणि शालेयपयोगी वस्तूंचे विविध नावीन्यपूर्ण उपाय उपलब्ध करून देणारे हे व्यासपीठ वर्षाच्या सुरुवातीला सादर करण्यास आम्ही उत्सुक आहोत."**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.